


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २२३ वा सोमवार दि २७ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# कोठाळेंच्या जिजाऊ बँकेचे घोटाळे चर्चेत!...

## अकोला - खामगाव शाखेतून दोघांनी केली साडेतीन कोटींची फसवणूक!

## सूत्रधारापर्यंत कानून के हात कधी पोहोचतील? अहो कोठाळे किती हे घोटाळे....

**जनसंचलन/बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक, अमरावती या संस्थेत अनेकदा केलेल्या बेबंद भ्रष्टाचार प्रकरणी नेहमी चर्चेत असणारे बँकेचे सेवानिवृत्त जलसंधारण विभाग तथा अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे हे कुप्रसिध्द झाले आहे. काही महिन्यापूर्वीच खामगाव येथील शाखेतून १०० कोटींचे कर्ज मिळवून देतो असे आमिष देऊन, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील बोंडे आणि माधव पांढरे पाटील या दोघांनी साडेतीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार व्यवसायिक अतूल झोटिंग यांनी दिली होती. दरम्यान तडजोडीसाठी आटापिटा सुरु होता.सीताबर्डी नागपूर पोलिसांनी ३ महिन्यानंतरही या तक्रारीवर गुन्हा दाखल केला नाही.त्यामुळे खऱ्या सूत्रधारा पर्यंत कानून के हात कधी पोहोचतील?असा प्रश्न उपस्थित झाला आहे. निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील बोंडे आणि माधव पांढरे पाटील या दोघांनी जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक,अमरावती खामगाव शाखेतून १०० कोटींचे कर्ज उपलब्ध करून देतो असे सांगत,अतूल झोटींग या व्यवसायिकांची साडेतीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार झोटींग यांनी नागपूर सीताबर्डी पोलिस ठाण्यात दिली आहे.साडेतीन कोटींची विचारणा केली की,निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील बोंडे आणि माधव पांढरे पाटील आत्महत्येची धमकी देतात असा स्पष्ट उल्लेख झोटींग यांनी दिलेल्या तक्रारीत आहे.तीन महिने उलटूनही या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही.दरम्यान पोलीस स्टेशन बाहेर तडजोडी साठी आटापिटा केला जात असल्याचे दिसून येते.या संस्थेचे बहुचर्चित अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे यांचेवर व बँकेतील काही संचालकांवर अनेक वेळा गैरव्यवहार केल्याप्रकरणी कारवाईचा बडगा उगारण्यात आलेला आहे. काही माजी संचालक व जागरूक नागरिकांनी या संस्थेच्या भ्रष्टाचाराची पोलखोल केली होती.तसेच माधव पांढरे पाटील यांनी सबसिडीच्या नावावर शेडनेट उभारण्याचे आमिष देत बुलढाणासह खामगाव तालुक्यातील ७ शेतकऱ्यांचे तब्बल ६६ लाख ८० हजार रुपये घशात घालून फसवणूक केल्याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी अटक केली होती, हे विशेष!

अजून बरेच काही पुढील भागात...




**जिजाऊ कमर्शियल कॉ-ऑप बँक लि.अमरावती अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे यांनी करोडो रुपयांचे केलेले नियमबाह्य कर्ज प्रकरण असेच सूरु असले तर ठेवीदारांनी ठेवलेला मेहनतीचा कष्टाचा पैसा हा सुरक्षित आहे का? हा प्रश्न आता ठेवीदारांमध्ये चर्चित असल्याचे पहावयास मिळत आहे**

# बुलढाणा जिल्ह्याची वाटचाल बिहारकडे? एकाच दिवसात ४ खून! काय चाललंय जिल्ह्यात?

## बुलढाण्याला रक्तरंजित अध्यायातून मुक्ती कधी मिळणार? चार खून, चार प्रश्न एसपी तांबे साहेब उत्तर देतील का?

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीने आता अक्षरशः बिहारची आठवण करून दिली आहे! एकाच दिवसात तब्बल चार खून - कुठे विकृत बापाने जुळ्या मुलींना चाकूने कापलं, कुठे मटण मार्केटमध्ये रक्ताच्या तळ्यात खून, तर कुठे उघड्यावरच चाकूने सपासप वार करून युवकाची हत्या! जिल्ह्यातील नागरिकांच्या तोंडून एकच प्रश्न एसपी तांबे साहेब, हे गुन्हेगार कायद्याला जुमानणार की नाही? पहिली घटना सर्व मानवतेला काळिमा फासणारी! अंढेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत रुई (जि. वाशिम) येथील राहुल चव्हाण या बापाने आपल्या दोन जुळ्या मुलींचा गळा चिरून निर्दयपणे खून केला. पत्नीशी किरकोळ वाद झाल्यानंतर संतापाच्या भरात त्याने दोन्ही निरपराध लेकरांना जंगलात नेऊन निर्दयतेने मारले! या घटनेने जिल्हाच नव्हे तर संपूर्ण राज्य हादरले आहे. दुसरी घटना शेगावमध्ये मटण मार्केटमध्ये मर्डर! संत नगरी शेगाव येथे नितीन उर्फ गोल्या गायकवाड (३५) याची मटण मार्केटमध्ये हत्या झाली. पूर्व वैमनस्यातून झालेल्या या खुनाने शहरातील शांततेला चिर बसला आहे. गर्दीतच हत्येचे नाट्य घडल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.




आणि तिसरी धक्कादायक घटना अंढेरा पुन्हा रक्तरंजित! देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथे आकाश उत्तम चव्हाण (२५)याची निर्घृण हत्या करण्यात आली. धक्कादायक म्हणजे ही घटना अंढेरा पोलिस ठाण्यापासून अवघ्या काही अंतरावरच घडली! आरोपी अयान सय्यद नासीर (१८२०) याने उघड्यावरच तीक्ष्ण शस्त्राने सपासप वार करत आकाशचा बळी घेतला. एका दिवसात चार मर्डर, जिल्हा पोलिस मात्र गप्प! हे प्रकार पोलिसांच्या नाकावर टिच्चून होत असताना, गुन्हेगारांचा आत्मविश्वास वाढलेला दिसतो. अवैध धंद्यांना चालना, गस्त व्यवस्थेतील त्रुटी आणि काही ठिकाणी राजकीय पाठबळामुळे गुन्हेगारीवर लगाम सुटल्याचे स्पष्ट दिसते. एसपी तांबे साहेब, जिल्ह्यातील नागरिक आता ठोस कारवाईची मागणी करत आहेत! गुन्हेगारांना उलटे लटकवून कायद्याची ताकद दाखवली नाही, तर बुलढाणा जिल्हा लवकरच बिहार मॉडेलकडे झुकू शकतो अशी जनतेची तीव्र प्रतिक्रिया आहे! संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे, संतापाचे आणि अस्वस्थतेचे वातावरण आहे.बुलढाण्याला रक्तरंजित अध्यायातून मुक्ती कधी मिळणार?

# ...तेजस्वी विचारवंत...

## संपादकीय लेख

महाराष्ट्रात जन्मलेल्या काही मोजक्याच थोर विद्वानांपैकी जयंत लेले हे एक होते. कॅनडातील क्वीन्स विद्यापीठात ते राज्यशास्त्र व समाजशास्त्राचे प्राध्यापक होते. जयंत लेलेंचे भारतीय परिप्रेक्ष्यात सर्वांत गाजलेले काम म्हणजे एलिट प्लुरालिजम अँड क्लास रूल हे त्यांचे पुस्तक. या पुस्तकाने देशातील व खास करून महाराष्ट्रातील राजकारणाच्या पटाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सूत्र बांधले गेले. प्रभुत्वशाली शेतकरी जातींची अभिजन सवर्णांबरोबर एकजूट झालेली असून भांडवली राज्य व्यवस्थादेखील जातिव्यवस्थेच्या पद्धतीनेच चालते, हे त्यांनी दाखवून दिले. प्रभुत्वशाली शेतकरी जाती या मध्यम व कनिष्ठ जातींमधील राजकीय आकांक्षा असलेले छोटे गट वा व्यक्तींना सत्तेत प्रतिनिधित्व देऊन समावून घेतात व दबलेल्या मोठ्या समाजघटकातील विद्रोहाच्या शक्यता धूसर होतात, हे लेलेंच्या मांडणीमुळे समजणे सोपे झाले. थोर मार्क्सवादी विचारवंत शरद पाटील यांनी या मांडणीचे सर्वप्रथम कौतुक केले व महाराष्ट्रभर त्याची चर्चा सुरू झाली. महाराष्ट्राच्या जडणघडणीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ते दादासाहेब गायकवाड, दादासाहेब रुपवते, वसंतराव नाईक अशा व्यक्तींच्या उदयास्ताचे अन्वेषण लेलेंच्या समाजशास्त्रीय सूत्राने उलगडता येते. सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून उदयाला आलेल्या नेतृत्वाला कसे निष्प्रभ केले गेले त्याचीही कारणे या मांडणीमुळे सुस्पष्ट होतात. लेले यांनी केलेली ज्ञानेश्वरी व वारकरी परंपरेबाबतची मांडणी महत्त्वपूर्ण असून मार्क्सवादी समाजशास्त्राच्या आधारे मध्ययुगातील समाज आणि परंपरांचा घेतलेला धांडोळा इतिहासातील कंगोरे उलगडून दाखवतो. महाराष्ट्राच्या राजकारणाचे अंतरंग समजाशास्त्र व राज्यशास्त्राच्या चौकटीतून समजावणाऱ्या लेलेंच्या निधनाने विचारवंतांच्या तारकामंडलातील तेजस्वी तारा निखळला. फुले, शाहू, आंबेडकर हे समाजसुधारक व कोसंबी, काणे, इरावती कर्वे अशा बुद्धिवंतांची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात हत्ती व कबूतरांवरून सुरू असलेल्या राजकारणाचे अन्वयार्थ उलगडण्यास आता लेलेंसारख्या विद्वानापेक्षा व्हॉट्सअॅपच अधिक महत्त्वाचे ठरतेय, हेच कटू सत्य आहे!

# विकासकामे रखडणार!



**जनसंचलन/ खामगाव**

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, नोव्हेंबर महिन्यात निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतींसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत सुरू असलेली विकासकामे पुढील तीन महिन्यांसाठी थांबण्याची शक्यता आहे. आचारसंहितेच्या अंमलबजावणीनंतर निधी वितरण, मंजुरी प्रक्रिया आणि नवीन कामांची निविदा यांवर तात्पुरता अडसर बसणार आहे. त्यामुळे रस्ते, जलपुरवठा, शाळा दुरुस्ती, ग्रामविकास अशा अनेक कामांवर परिणाम होणार आहे. दरम्यान, जि.प. सदस्य आरक्षणासंदर्भातील प्रकरणे न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होती; मात्र सर्व याचिका आता निकाली निघाल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची प्रतिक्षा आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बिहारसाठी एनडीएचं जागावाटप ठरलं

## भाजपचं मोठं बलिदान; 'मोदींच्या हनुमाना'चाही सन्मान



**पाटणा :** राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं बिहार विधानसभा निवडणुकीसाठीचं जागा वाटपाचं सूत्र ठरलं आहे. गेल्या काही दिवसांपासून जागा वाटपाच्या चर्चा सुरु होत्या. एनडीएमधील घटक पक्षांमध्ये नाराजीनाट्यदेखील पाहायला मिळालं. मात्र अखेर जागा वाटपाचा फॉर्म्युला निश्चित झालेला आहे. गेल्या निवडणुकीत मोठ्या फरकानं मोठा भाऊ ठरुनही भाजपनं यंदा लहान भावाची भूमिका स्वीकारली आहे. भाजपनं मित्रपक्षांसाठी मोठं बलिदान दिलं आहे. एनडीएतील लहान पक्षांना सन्मानजनक जागा देण्यात आलेल्या आहेत. बिहार विधानसभा निवडणूक दोन टप्प्यात होईल. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होईल. तर १४ नोव्हेंबरला मतमोजणी असेल. बिहारमध्ये विधानसभेच्या एकूण २४३ जागा आहेत. यातील १०१ जागा जेडीयू , १०० जागा भाजप , २९ जागा लोजप (आर), ७ जागा हिंदुस्तानी अवामी मोर्चा आणि ६ जागा राष्ट्रीय लोक मार्चा लढवेल. गेल्या निवडणुकीत जेडीयूनं ११५ जागा लढवल्या होत्या. त्यातील ४३ जागांवर पक्षाला विजय मिळाला होता. ७२ जागांवर पक्षाचा पराभव झाला होता. यंदा जेडीयू १४ जागा कमी लढवणार आहे. जेडीयूनं या जागा मित्रपक्षांसाठी सोडल्या आहेत.भाजप २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत लहान भावाच्या भूमिकेत असेल. मागील निवडणुकीत भाजपचा स्ट्राईक रेट उत्तम होता. त्यामुळे यंदा भाजप मोठ्या भावाच्या भूमिकेत दिसेल, अशी चर्चा होती. पण युतीचं गणित जुळवताना भाजपनं लहान भावाची भूमिका स्वीकारली आहे. २०२० मध्ये भाजपनं ११० जागा लढवून ७४ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे एनडीएमध्ये भाजप मोठा भाऊ ठरला. मात्र यंदा भाजप १०० जागा लढवणार आहे. भाजपनं १० जागांचं बलिदान मित्रपक्षांसाठी दिलं आहे.यंदा एनडीएमध्ये दोन पक्ष वाढले आहेत. तर एक पक्ष आघाडीतून बाहेर पडला आहे. लोजप (आर) आणि रालोमो पुन्हा एनडीएमध्ये परतले आहेत. चिराग पासवान यांच्या लोजपनं (आर) जागावाटपात २९ जागा मिळवल्या आहेत. सुरुवातीला त्यांनी ४० ते ४५ जागा मागितल्या होत्या. मग त्यांनी आपली मागणी ३५ वर आणली. भाजपनं त्यांना २५ ते २६ जागा देऊ केल्या. सोबत विधान परिषद आणि राज्यसभेची प्रत्येकी एक जागा देऊ केली. अखेर लोजप (आर) २९ जागा लढवणार आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत लोजप स्वबळावर लढला होता. त्यांनी १३४ जागांवर उमेदवार दिले. यातील बहुतांश जागा एनडीएमध्ये जेडीयूच्या वाट्याला गेल्या होत्या. लोजपला केवळ १ जागा जिंकता आली. पण लोजप उमेदवारांनी घेतलेल्या मतांमुळे जेडीयूनं जवळपास ३५ जागा गमावल्या. २०१५ मध्ये ७१ जागा जिंकणारा जेडीयू २०२० मध्ये ४३ जागांवर आला. स्वत:ची ओळख 'मी मोदींचा हनुमान' अशी सांगणाऱ्या चिराग पासवान यांच्या पक्षानं भाजपचा मित्रपक्ष असलेल्या जेडीयूचा पद्धतशीरपणे कार्यक्रम केला. जेडीयूनं ३५ जागा गमावल्यानं भाजप एनडीएमध्ये आपोआप मोठा भाऊ झाला. मात्र मोदींच्या हनुमानाच्या कामगिरीचा फटका एनडीएला बसला. एनडीएला १२५ जागांवर समाधान मानावं लागलं. त्यांना काठावरचं बहुमत मिळालं.

## विश्वासू सहकाऱ्यावर एकनाथ शिंदेंची खास जबाबदारी

**ठाणे :** विधान परिषद निवडणुकांना अद्याप वर्षभराचा कालावधी असला तरी इच्छुकांनी आतापासूनच मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे. इच्छुकांमध्ये प्रस्थापित नेत्यांसह काही नव्या भिडूंचाही समावेश आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांनीही पुणे शिक्षक मतदारसंघासाठी दंड थोपटल्याचे चित्र आहे. या विभागातील शिक्षकांच्या गाठीभेटी घेत त्यांनी फील्डिंग लावण्यास सुरुवात केल्याची चर्चा आहे. अशातच एकनाथ शिंदे यांनी आपल्या विश्वासू सहकाऱ्याला बळ देण्यासाठी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.



मंगेश चिवटे यांची पुणे शिक्षक मतदार नोंदणी प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातील मतदारांची नोंदणी करणे आणि या विभागातून शिवसेनेचा उमेदवार जास्त मतांनी निवडून आणण्याची जबाबदारी देणारे नियुक्तीपत्र शिवसेनेचे राज्य समन्वयक, ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी काढले आहे. हे नियुक्तीपत्र नुकतेच चिवटेंना देण्यात आले.पुणे शिक्षक मतदारसंघातून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी गेल्या एक वर्षापासून तयारी सुरू केली आहे. सोलापूर, सांगली, कोल्हापूर येथे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेच्या वतीने शिक्षक मेळावे घेण्यात आले आहेत. मंगेश चिवटे यांनी शिक्षकांच्या आरोग्य विषयक जिव्हाळ्याच्या प्रश्नांना हात घातला आहे. या निवडणुकीपूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांना कॅशलेस विमा योजना लागू करणार असे सांगत मंगेश चिवटे पुणे शिक्षक विभागातून आपला उमेदवारीचा प्रचार करत असल्याचे दिसते.

## घायवळला पासपोर्ट मिळण्याबाबत चौकशी करा

**पुणे :** घायवळ याने पासपोर्ट काढताना 'गायवळ' नावाचा वापर केल्याची माहिती पोलीस व्हेरिफिकेशन रिपोर्टमधून समोर आली होती. ही सगळी माहिती समोर आल्यानंतर आणि भाजप नेते अडचणीत येत असल्याचं लक्षात आल्यानंतर तब्बल आठ ते दहा दिवसांनंतर भारतीय जनता पार्टी कडून अधिकृत पत्रकार परिषद घेत निलेश घायवळ याला पासपोर्ट मिळताना कोणा कोणाचा सहभाग होता याची चौकशी करण्याची मागणी केली आहे.भाजपचे शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी याबाबत सविस्तर पत्रकार परिषद घेत पोलीस व्हेरिफिकेशन रिपोर्टचा दाखला देताना महाविकास आघाडीच्या नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत. 'निलेश घायवळ हा परदेशात पळून गेला आहे. त्याने पासपोर्ट कसा घेतला त्याबाबत धक्कादायक माहिती देत पासपोर्ट घेतला आहे. तो अहिल्यानगरमधील सोनेगावचा राहिवासी आहे. त्याने ज्यावेळेस पासपोर्ट मिळवला त्यावेळी मविआ.चे सरकार होते.

## विनोद तावडेंची 'ती' भेट अन भाजप आमदाराचा राजीनामा

**पाटणा :** बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीचा धुराळा उडालेला असताना सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या आमदारानं राजीनामा दिला आहे. भाजप आमदार मिश्री लाल यादव यांनी शनिवारी पक्षाचा राजीनामा देत असल्याची घोषणा केली. पक्ष दलित आणि मागासवर्गीयांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यादव यांनी केला.



मिश्री लाल यादव दरभंगा जिल्ह्यातील अलीनगर विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व करतात. त्यांनी आज पाटण्यात पत्रकार परिषद घेतली. प्रदेशाध्यक्ष दिलीप जायस्वाल यांच्याकडे लवकरच राजीनामा सुपूर्द करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. 'मी अलीनगरमधून एनडीएकडून पहिल्यांदा विजय मिळवला होता. त्याआधी इथे धनाढ्य, बाहुबली उमेदवार पराभूत झाले होते,' असं यादव म्हणालेमिश्री लाल यादव अनेक दिवसांपासून पक्षावर नाराज आहेत. यावेळी भाजप अलीनगर मतदारसंघातून लोकगायिका मैथिली ठाकूरला देण्याच्या विचारात आहे. तिनं भाजपचे महासचिव विनोद तावडे यांची काही दिवसांपूर्वीच भेट घेतली. गेल्या काही दिवसांत तिनं भाजप सरकारच्या धोरणांचं कौतुक केलं आहे. त्यानंतर मैथिली ठाकूर भाजपकडून अलीनगरची जागा लढवेल, या चर्चांनी जोर धरला. त्यामुळे यादव यांची चलबिचल अधिकच वाढली. विनोद तावडे यांच्याकडे भाजपनं बिहार निवडणुकीची जबाबदारी सोपवलेली आहे.मिश्री लाल यादव यांनी २०२० मध्ये झालेली विधानसभा निवडणूक विकासशील इंसान पार्टीकडून लढवली आणि जिंकली.

## पश्चाताप व्यक्त करत ठाकरेंनी द्रष्ट्या शिलेदाराची आठवण काढली

**ठाणे :** शिवसेनेचे उपनेते, ठाण्याचे माजी महापौर दिवंगत अनंत तरे यांच्या आठवणींना शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उजाळा दिला. अनंत तरे यांचं ऐकायला हवं होतं. त्यांचं ऐकलं असतं, तर शिवसेना फुटलीच नसती. आता पश्चाताप होतोय, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. अनंत तरे शिवसेनेकडून महापौर, आमदार राहिले. त्यांच्या आयुष्यावरील 'अनंत आकाश' पुस्तकाचं प्रकाशन आज उद्धव ठाकरेंच्या हस्ते संपन्न झालं. योगेश कोळी यांनी तरे यांच्या आयुष्यावरील पुस्तक लिहिलं आहे. ठाण्यातील गडकरी रंगायतन सभागृहात पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. तेव्हा ठाकरेंनी भाषण केलं. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेच्या



इतिहासातील सगळ्यात मोठं करणाऱ्या एकनाथ शिंदे यांचा अप्रत्यक्षपणे समाचार घेतला. 'आता त्यांना पदं मिळाली आहेत. पण ज्यावेळी त्यांचा वापर संपेल, तेव्हा त्यांना कचराकुंडीत फेकून देण्यात येईल. तेव्हा मग कपाळ्यावर हात बडवत तुम्हाला ते याच ठाण्यात दिसतील. अनंत तरेंचं तेव्हाच ऐकायला हवं होतं. आता मला पश्चाताप होतोय. तेव्हा तरेंचं ऐकलं असतं तर शाहांसमोर हंबरडा फोडणारे बघायला मिळाले नसते,' असा टोला उद्धव ठाकरेंनी शिंदे यांना लगावला. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड करत संपूर्ण पक्षच ताब्यात घेतला. त्यांनी शिवसेनेचं चिन्हही मिळवलं. या बंडानंतर अनंत तरे यांचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यात त्यांनी शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर कडाडून टीका केली होती. शिंदेंना आवरा असं मी उद्धवजींना सांगितलं आहे. नाही तर हा दुसरा नारायण राणे होईल, अशी भीती तरे यांनी व्यक्त केली होती. तरे यांचं ४ वर्षांपूर्वी निधन झालं. पण शिंदेंबद्दलचा त्यांचा व्हिडीओ बंडानंतर व्हायरल झाला.'मी जेव्हा रायगड लोकसभा लढवली तेव्हा शिंदे नगरसेवक पण नव्हते. आता सगळे निर्णय ते एकटेच घेतात. या संघटनेतील निर्णय घेण्याचा अधिकार फक्त मातोश्रीला आहे. आधी तो माननीय बाळासाहेबांना होता, आता तो अधिकार उद्धवजींना आहे. आम्ही जर निर्णय घ्यायला लागलो, तर या संघटनेचे तुकडे तुकडे होणार. माझी नाराजी उद्धवजींवर नाही. एकनाथ शिंदे ज्या पद्धतीनं काम करत आहेत, त्यांना पाहून मी उद्धवजींना सांगितलंय की याला आवरा. या शिंदेला आवरा. नाही तर हा दुसरा नारायण राणे होईल. हा फक्त आपले आपले निवडतो. बाकी सगळ्यांना कामाला लावतोय,' असं तरे म्हणाले होते. शिंदे यांच्या बंडानंतर तरे यांचं भाकित पूर्णपणे खरं ठरल्याची चर्चा झाली.

# पुण्यात रस्त्याच्या बाजूला बॉडी आढळली

## पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवली; १२ तासांत धक्कादायक माहिती उघड..

**पुणे :** पुणे शहरातील कात्रज येथील गुजर-निंबाळकरवाडी परिसरात गवतात कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला होता. या मृतदेहाचे रहस्य अवघ्या १२ तासांत उलगडण्यामध्ये भारती विद्यापीठ पोलिसांना यश आले. मृत व्यक्तीच्या मित्रानेच त्याची हत्या केल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे. एकत्र राहताना उसन्या पैशांच्या वादातून व या व्यक्तीच्या सततच्या मारहाणीला कंटाळून मित्रानेच त्याचा काटा काढल्याचं तपासात उघड झालं असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सद्दाम उर्फ सलमान शेख (वय ३५, रा. गुजर निंबाळकरवाडी) असं खून झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. त्याचा मित्र विक्रम चैठा रोतिया (वय ३२, रा. सणसनगर मळवाडी, निंबाळरकरवाडी) याला या खून प्रकरणात अटक करण्यात आली आहे. आरोपीविरोधात पुणे शहरातील भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सद्दाम व विक्रम हे दोघे रोजंदारीवर मोलमजुरीची कामे करत असत. तसंच हे दोघेही एकाच खोलीत राहायचे. सद्दाम व विक्रम



यांच्यात हातउसने घेतलेल्या पैशांवरून अधूनमधून वाद व्हायचे. सद्दाम हा विक्रमला लहान-सहान गोष्टींवरून मारहाण करून त्रास देऊ लागला होता. गुन्ह्याच्या दिवशीही दोघांमध्ये जोरदार भांडण झालं होतं. या भांडणाचं रुपांतर नंतर मारामारीत झालं आणि बघता बघता विक्रमने सद्दामचा जीव घेतला. सद्दाम चा खून केल्यानंतर विक्रमने त्याचा मृतदेह खोलीच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेत फेकून पळ काढला. शनिवारी दुपारी खुनाचा हा प्रकार उघड झाल्यानंतर भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. मृताच्या मोबाइल नंबरचा मागोवा घेऊन तांत्रिक तपास केला असता त्यातून मिळालेले तपशील आणि गुप्त बातमीदाराने सांगितलेल्या माहितीच्या आधारे विक्रमनेच सद्दामचा खून केल्याचं स्पष्ट झालं. त्यानुसार, पोलिसांनी शोधमोहीम राबवून आरोपीला रविवारी गुजरवाडी भागातून ताब्यात घेतलं आहे.

दरम्यान, पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे, सहायक पोलीस निरीक्षक समीर शेंडे, पोलीस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी यांनी सहभाग घेतला.

## पहाटे झोपेत बेडवरुन पडले, पोलिसाला मृत्यूने गाठलं



**सोलापूर :** सोलापुरात एका वाहतूक पोलिसाचा झोपेत बेड वरून पडल्याने मृत्यू झाला आहे. संभाजी शिवाजी दोलतोडे (वय ३२, रा. अरविंद धाम, पोलिस वसाहत सोलापूर) असे मृत्यू झालेल्या वाहतूक पोलिसाचे नाव आहे. वाहतूक पोलिसाच्या पत्नीने डॉक्टरांना दिलेल्या माहितीनुसार रविवारी पहाटे पाचच्या सुमारास झोपेतच बेडवरून पडले. त्यांना डोक्यामागील बाजूस जबर मार लागला. त्यानंतर त्यांना उलटी झाली. या घटनेने सोलापूर पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे.

संभाजी दोलतोंडे यांच्या पत्नीने डॉक्टरांना सांगितले की ते बेडवर झोपेत पडले होते त्यांना डोक्यामागील बाजूस जबर मार लागला. डोक्याला आतून गंभीर मार लागल्याने संभाजी दोलतोडे यांना उलटी झाली. घरच्यांनी ताबडतोब संभाजी यांस सोलापूर शहरातील अश्विनी हॉस्पिटल येथे पहाटे साडेपाचच्या सुमारास दाखल केले.डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतदेहाची उत्तरीय तपासणी करून अहवाल नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.सोलापूर शहर वाहतूक शाखेतील मृत पोलिस अंमलदार संभाजी दोलतोडे हे मूळगाव उपळाई खुर्द येथील होते. कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी संभाजी यांच्यावरच होती. संभाजी याना एक आठ वर्षाची मुलगी आणि सहा वर्षांचा मुलगा आहे. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबाचा आधार गेला आहे. संभाजी दोलतोडे अंत्यविधी यांच्या मूळ गावी करण्यात आला.

## शेतात जाताना चिमुकलीवर बिबट्याचा हल्ला

**मंचर :** शेतात काम करणाऱ्या आजोबांना पिण्यासाठी पाणी घेऊन जाणाऱ्या पाच वर्षीय चिमुरडीवर बिबट्याने हल्ला केला. यामध्ये तिचा मृत्यू झाला. पिंपरखेड (ता. आंबेगाव) येथील ढोमे मळ्यात रविवारी सकाळी सुमारे ९.३० वाजता ही दुर्दैवी घटना घडली.शिवन्या शैलेश बोंबे (वय पाच) असे मृत्यू झालेल्या चिमुकलीचे नाव आहे. शिवन्या पहिलीच शिकत होती. तिचे आई-वडील शेतकरी असून, तिला दीड महिन्याचा भाऊ आहे.रविवारी सकाळी शिवन्याचे आजोबा शेतात गेले होते. त्यांना पिण्यासाठी पाणी घेऊन जात असताना ऊसाच्या शेतात दबा धरुन बसलेल्या बिबट्याने तिच्यावर हल्ला केला. शिवन्याचा वेदनेने विव्हळणारा आवाज ऐकून नागरिक तिच्या मदतीसाठी धावले. यामुळे बिबट्या तकाट पळाला. मात्र, तोपर्यंत शिवन्या गंभीर जखमी झाली होती. नागरिकांनी तिला तत्काळ मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. दिलीप वळसे पाटील यांनी बोंबे कुटुंबाला वन विभागाने भरपाई द्यावी, अशी सूचना केली.

## तीन मित्रांचा भीषण अपघात, दोघांनी जागीच जीव गमावला

**छत्रपती संभाजीनगर :** भरधाव हायवा ट्रकने समोरून येणाऱ्या पिकपला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की यामध्ये पिकपचा अक्षरशः चुराडा झाला. यामध्ये दोन तरुण जागीच ठार झाले आहेत. अपघात सिल्लोड भोकरदन रस्त्यावरील पिंपरी फाट्यावर घडला. या घटनेमुळे दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

विवेक रेवणात जेठे (वय २८, राहणार टाकळी तालुका सिल्लोड), योगेश गजानन सोनवणे (वय २८, राहणार जळगाव सपकाळ तालुका भोकरदन) असं मयत झालेल्या दोन तरुणांचे नाव आहे. तर पवन गायकवाड (वय २७, राहणार सराटी तालुका फुलंब्री) असे जखमी झालेल्या तरुणाचं नाव आहे.याप्रकरणी अधिक माहिती अशी की, योगेश विवेक पवन हे तीन मित्र साहित्य खरेदीसाठी सिल्लोड येथून भोकरदनला पिकप एम एच २० इ. एल ५३५९ या वाहनाने जात होते. त्यांची गाडी पिंपरीपर्यंत गेल्यानंतर



भोकरदनकडून भरधाव येणाऱ्या हायवा क्रमांक एम एच २७ बी वाय ०००४ चालकाने समोरून जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, पिकपचा अक्षरशः चुराडा झाला. यामध्ये विवेक जेठे, योगेश सोनवणे हे वाहनात अडकले होते. त्यानंतर त्यांना तात्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. घटनेनंतर हायवा चालक घटनास्थळावरून पसार झाला होता. दरम्यान, या प्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये हायवा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहे.

## १२ वर्षांच्या मुलाला प्रेमाच्या जाळ्यात अडकवलं

**रायगड :** अल्पवयीन मुलावर भावनिक दबाव टाकून त्याच्याकडून पैसे उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रायगड जिल्ह्यात खालापूर तालुक्यातील एका गावात अवघ्या १२ वर्षांच्या एका युवकाने अल्पवयीन मुलीच्या माध्यमातून प्रेमाच्या जाळ्यात अडकवलं. त्यानंतर त्याला ब्लॅकमेल करत तब्बल साडेतीन लाख रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली आहे.पीडित मुलगा राकेश (नाव बदलले आहे) हा अवघ्या बारा वर्षांचा आहे. आरोपी सुमेध प्रेमनाथ जाधव (वय अंदाजे २०-२२, रा. सावळे, कर्जत) याने नातेवाईक असलेल्या एका मुलीची पीडित मुलाशी मैत्री करून दिली. काही दिवसातच या मुलीने पीडिताशी 'प्रेम संबंध' निर्माण केल्याचे भासवलेभावनिक नात्याचा गैरफायदा घेत आरोपी सुमेधने मुलाला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. तू पैसे दिले नाहीस, तर तुझं प्रेम प्रकरण तुझ्या आई-वडिलांना सांगेन... तुझं आयुष्य उद्धवस्त करुन टाकेन... तुला ठार मारेन अशा स्वरुपाच्या धमक्या देऊन त्याने पीडितावर मानसिक दबाव टाकला.

## सिम कार्डचा किरकोळ वाद बेतला ६४ वर्षीय वृद्धाच्या जीवावर

**मुंबई :** वांद्र्यात एका ६४ वर्षीय वृद्धाची शुल्लक कारणावरून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ९ ऑक्टोबर रोजी वांद्रे (प.) येथे या वृद्धाच्या रूममेटवर त्याची हत्या केल्याचा आरोप आहे. मृताचे नाव शिवजी बनारसिंग असे असून ते वांद्रे पश्चिम येथील मेहबूब स्टुडिओजजवळील सार्वजनिक शौचालयात केअरटेकर म्हणून काम करत होते.

आरोपीचे नाव संजीव यादव (२८) असे आहे. यादव वांद्रे पश्चिम येथील एका निवासस्थानी रुग्णांचा केअरटेकर म्हणून काम करतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघेही त्या सार्वजनिक शौचालयाच्या वरील पहिल्या मजल्यावर राहत होते. गुरुवारी दुपारी तीन ते पाच या वेळेत ही घटना घडली. काही दिवसांपूर्वी शिवजींचे सिम कार्ड हरवले होते आणि त्यांनी याबाबत यादववर संशय घेतला. यामुळे शिवजींनी यादवला खोली सोडून जाण्यास सांगितले. या कारणावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. वादाचे रुपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने



रागाच्या भरात शिवजींचा गळा आवळून त्यांचा जीव घेतला.घटनेनंतर यादवने कोणालाही काही सांगितले नाही. जेव्हा शौचालयाच्या व्यवस्थापकाने शिवजींना बेशुद्ध अवस्थेत पाहिले, तेव्हा त्यांनी संध्याकाळी सुमारे सहा वाजता वांद्रे पोलिसांना याची माहिती दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले तेव्हा यादव तिथेच होता, पण तो पूर्णपणे शांत होता. पोलिसांनी तातडीने शिवजींना वांद्रे पश्चिम येथील भाभा रुग्णालयात नेले. यादवही त्यांच्यासोबत गेला. मात्र डॉक्टरांनी शिवजींना मृत घोषित केले. त्यानंतर त्यांचा मृतदेह जुहू येथील कूपर रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला. पोलिसांनी मृतदेह तपासला असता मानेवर खुणा आणि कानातून रक्त येत असल्याचे आढळले. यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलली आणि हत्या झाल्याचा संशय अधिक दृढ झाला. सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, घटनेच्या वेळी खोलीत फक्त यादव आणि शिवजी उपस्थित असल्याचे स्पष्ट झाले.सखोल चौकशीनंतर यादवने अखेर शिवजींचा गळा दाबून खून केल्याची कबुली पोलिसांसमोर दिली. या कबुलीनंतर पोलिसांनी यादवला ताब्यात घेतले. प्रकरणाचा तपास वांद्रे पोलिस पुढे करत आहेत. घटनेनंतर वांद्रे पोलिसांनी यादवला अटक केली असून, अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी न्यायालयाने त्याला १३ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

# रोहित शर्मा वन डे वर्ल्ड कप २०२७ खेळून निवृत्त होणार हिटमॅनच्या जवळच्या व्यक्तीकडून खुलासा...

जनसंचलन/मलकापूर पांग्रा

मुंबई : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत रोहित शर्मांने केलेल्या कामगिरीमुळे तो २०२७ च्या विश्वचषकात खेळण्याची शक्यता वाढली आहे. रोहितच्या वाढत्या वयामुळे ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीवर पूर्णविराम लागेल असे म्हटले जात होते. मात्र, याउलट रोहित शर्मांने दमदार फलंदाजी करत मालिकेत मोठ्या धावा केल्या. सिडनी येथे तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावण्यापूर्वी त्याने ॲडलेड येथे अर्धशतक केले होते. तो भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. रोहितला तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात प्लेअर ऑफ द मॅच आणि प्लेअर ऑफ द सिरीज ने त्याला गौरवण्यात आलं. अशातच रोहितच्या निवृत्तीबाबत त्याच्या बालपणीच्या कोचे मोठे विधान केले आहे. ङ्क्षङ्क्षरोहितने आज ज्या प्रकारे फलंदाजी केली आणि भारताच्या विजयात योगदान दिले, सामना पाहून खूप आनंद झाला. तो २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक खेळेल आणि त्यानंतरच निवृत्त होईल.फ्फ सिडनी येथे २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मांने १२१ धावांची नाबाद खेळी केली. हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ५० वा शतक ठरला. या दरम्यान त्याने विराट कोहलीसोबत शतकी भागीदारी केली. २०20 नंतर दोघांमध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०० किंवा त्याहून अधिक धावांची भागीदारी झाली. पर्थ आणि ॲडलेड येथे सलग दोन वेळा शून्यावर बाद झाल्यानंतर ७४ धावांची नाबाद खेळी करणाऱ्या विराट कोहलीबद्दल बोलताना ते म्हणाले की, विराटबद्दल रोज गैरसमज होतात. तो असा खेळाडू आहे जो कधीही आणि कुठेही चांगली कामगिरी करू शकतो. आज त्याने ज्या प्रकारे खेळले ते पाहून चांगले वाटले. सचिन तेंडुलकरने खूप पूर्वी एका समारंभात सांगितले होते की, रोहित आणि विराट हेच असे खेळाडू असतील जे त्याचे विक्रम मोडतील. दोघांनाही त्याच्या विक्रमांच्या जवळ पोहोचताना पाहून आनंद होत आहे. रोहित शर्मांने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत केलेल्या जबरदस्त पुनरागमनामुळे





त्याच्या २०२७ च्या विश्वचषक खेळण्याच्या दाव्याला बळ मिळाले आहे. सिडनी येथे तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने १२१ धावांची नाबाद खेळी करत भारताला विजय मिळवून दिला.

## जोशना चिनप्पाला कारकिर्दीतील ११ वे पीएसए विजेतेपद

**योकोहामा–जपान :** दोन वेळा आशियाई विजेती ठरलेली जोशना चिनप्पा हिने सोमवारी योकोहामा येथे आयोजित जपान ओपन स्क्वॅश स्पर्धेचे महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले.

जागतिक क्रमवारीत ११७ व्या स्थानावर असलेल्या आणि स्पर्धेत बिगरमानांकित असलेल्या ३९ वर्षीय जोशनाने अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत ५३ व्या स्थानावर असलेल्या इजिप्तच्या हाया अलीला ११–५, ११–९, ६–११, ११–८ अशा फरकाने पराभूत करून पीएसए चॅलेंजर स्पर्धेतील जेतेपदावर आपली मोहोर उमटवली. हाया अलीविरुद्ध चिनप्पाची ही दुसरी लढत होती. यापूर्वी याच वर्षी बर्मुडा



येथील दुर्सया फेरीत त्यांचा सामना झाला होता. यात भारतीय खेळाडूला ११–८, १०–१२, ५–११, ११–९, ११–८ असा पराभव पत्करावा लागला होता. माजी जागतिक क्रमवारीत १० व्या स्थानावर असलेली चिनप्पा, २०२३ हँग्झू आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर गुडघ्याच्या शस्त्रक्रियेतून सावरल्यानंतर दमदार फॉर्ममध्ये आहे. त्या स्पर्धेत भारताला कांस्यपदक मिळवून देण्यात तिचा महत्त्वाचा वाटा होता.

## द.आफ्रिकेचा बांगलादेशवर ३ गडी राखून विजय



**विशाखापट्टणम :** मेरिझॅन कॅप (५६), ट्रियॉन (६२) व नदिने डी क्लर्कने (३७) यांनी दडपण झुगारून सोमवारी येथे झालेल्या रोमांचक महिला विश्वचषक सामन्यात दक्षिण आफ्रिकेला बांगला देशवर ३ गडी राखून विजय मिळवून दिला. वास्तविक, २३३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेने एकवेळ २३ व्या षटकात ७८ धावांत ५ गडी गमावले होते. पण, अष्टपैलू खेळाडू मेरिझॅन कॅप आणि क्लो ट्रियॉन यांनी सहाव्या गड्यासाठी ८५ धावांच्या महत्त्वपूर्ण भागीदारीच्या जोरावर विजय खेचून आणला. पुढे क्लर्कने त्यावर शिक्कामोर्तब केले.

दक्षिण आफ्रिकेने अखेरीस केवळ ३ चेंडू बाकी असताना हे लक्ष्य गाठले. कॅप आणि ट्रियॉन बाद झाल्यानंतर क्लर्कने २९ चेंडूंत नाबाद ३७ धावांची खेळी केली. तिला शूर्णा अख्तरने लाँग–ऑफवर जीवदान दिले होते. त्यानंतर डी क्लर्कने चौकार आणि षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. डी क्लर्कने यापूर्वी भारताविरुद्धही सामना जिंकून देणारी खेळी केली होती.

प्रारंभी युवा अष्टपैलू खेळाडू शूर्णा अख्तरने केलेल्या झंझावाती ३५ चेंडूंतील नाबाद ५१ धावांच्या खेळीच्या जोरावर बांगला देशने संथ सुरुवातीनंतरही ६ गडी गमावून २३२ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली. शर्मिन अख्तर (५०) आणि कर्णधार निगार सुलताना (३२) यांनी तिर्सया विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी करून बांगला देशच्या डावाला आकार दिला होता.

## सात्त्विक-चिरागचे हंगामातील पहिल्या जेतेपदाकडे लक्ष

**ओडेन्से (डेन्मार्क) :** भारताचे अव्वल दुहेरीचे खेळाडू सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी आजपासून (मंगळवार, दि. १४) खेळवल्या जाणाया ९ लाख ५० हजार बक्षीस रकमेच्या डेन्मार्क ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत हंगामातील पहिले जेतेपद मिळवण्यासाठी महत्त्वाकांक्षी असतील. या वर्षात सात्त्विक व चिराग यांना विजयश्रीने सातत्याने हुलकावणीही दिली असून येथे तरी ते ही कसर भरून काढू शकणार का, इतकीच उत्सुकता असेल.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या या सहाव्या मानांकित जोडीचा पहिला सामना स्कॉटलंडच्या ख्रिस्तोफर ग्रिमली आणि मॅथ्यू ग्रिमली यांच्याशी होईल. सात्त्विक आणि चिराग यांनी या हंगामात सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. त्यांनी हाँगकाँग आणि चायना मास्टर्स सुपर ७५० स्पर्धांमध्ये सलग अंतिम फेरी गाठली, तसेच पॅरिसमध्ये दुसरे जागतिक कांस्यपदक पटकावले आहे.

पुरुष एकेरीतील आव्हान




पुरुष एकेरीत, जागतिक क्रमवारीत २८ व्या क्रमांकावर असलेला आयुष शेट्टी सलामीच्या फेरीत फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्ह याचा सामना करेल. जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेला लक्ष्य सेन आयर्लंडच्या न्हाट गुयेन विरुद्ध खेळेल. २०२० ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिल्यानंतर फॉर्म गमावलेल्या २०२१ च्या जागतिक कांस्यपदक विजेत्या लक्ष्यने सप्टेंबरमध्ये हाँगकाँग सुपर ५०० स्पर्धेत उपविजेतेपद मिळवत आपला फॉर्म पुन्हा प्राप्त केला होता. मात्र, नुकत्याच जपानच्या कोदाई नाराओका आणि वितिदसर्नविरुद्ध झालेल्या पराभवामुळे त्याच्या कामगिरीतील सातत्याची गरज अधोरेखित झाली आहे.

### महिला दुहेरीत ऋतुपर्णा, श्वेतपर्णावर भिस्त


महिला दुहेरीत ऋतुपर्णा पांडा आणि श्वेतपर्णा पांडा स्कॉटलंडच्या ज्युली मॅकफर्सन आणि सियारा टॉरेन्स यांचा सामना करतील. तर, कविप्रिया सेल्वम आणि सिमरन सिंघी या बल्गेरियाच्या गॅब्रिएला आणि स्टेफानी स्टोएवा यांच्याशी दोन हात करतील. महिला एकेरीत युवा शटलर अनमोल खरब हिचा सलामीचा सामना इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा हिच्याशी होईल.

# विवेक ओबेरॉय आहे तब्बल १२०० कोटींच्या संपत्तीचा मालक

**मुंबई :** विवेक ओबेरॉय हा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांत काम केलं आहे. परंतु, विवेक फक्त अभिनेता नसून एक यशस्वी उद्योजकसुद्धा आहे. अशातच त्याने नुकतंच त्याच्या बिझनेसबद्दल सांगितलं आहे.

विवेकने वर्षानुवर्षे रिअल इस्टेट, एज्यु-टेक, दागिने, ॲग्रो-टेक, फिनटेक आणि इतर उद्योगांमध्ये गुंतवणूक करून, आता त्याची एकूण संपत्ती सुमारे १२०० कोटी इतकी आहे. तो बॉलीवूडमधील सर्वात श्रीमंत सेलिब्रिटींपैकी एक मानला जातो. त्याने नुकतीच 'एनडीटीव्ही'ला मुलाखत दिली. यामध्ये त्याने तो त्याचा व्यवसाय कसा सांभाळतो याबद्दल सांगितलं आहे.

व्यवसाय वाढवण्याबद्दल तो म्हणाला, "जेव्हा मला समजलं की, पैसे कसे कमवायचे, तेव्हा मी त्याच गोष्टींची पुनरावृत्ती करत राहिलो. यादरम्यान अनेक चढउतार आले." विवेकने सांगितलं की, त्याच्या कॉलेजच्या बाहेर असणाऱ्या पानवाल्यांकडून तो स्टॉक मार्केटबद्दल सल्ले घ्यायचा. तो पुढे म्हणाला, मी तिथल्या डोसा, चहा आणि पान-बिडी सारख्या विक्रेत्यांना आर्थिक मदत करत होतो. विवेकने सांगितले की, तो तरुण असताना त्याने शेअर बाजाराचं प्रशिक्षण घेतलं आणि एका ब्रोकरकडून ट्रेडिंग आणि बाजारातील वेगवेगळ्या पैलूंविषयी गोष्टी जाणून घेतल्या. यावेळी त्याने तो जेव्हा अभिनयाकडे वळला, तेव्हा त्याचं व्यवसायाकडे थोडं दुर्लक्ष झालं, कारण तो फक्त कुठल्यातरी उद्घाटनाला आणि लग्नांना जाऊन यातून पैसे कमवत



होता.असं सांगितलं. विवेकने सांगितलं की, त्याला कधीच पैशांची कमतरता जाणवली नाही आणि पैसे कमी होण्याची भीतीही वाटली नाही, कारण तो नेहमी गुंतवणूक करताना खूप काळजी घ्यायचा. विवेक याबद्दल म्हणाला, "जेव्हा मी १७-१८ वर्षांचा होतो, तेव्हा मला मी काहीतरी खूप मोठं करणार आहे असं वाटलेलं. त्यावेळी मी कुठलाही विचार न करता एक मोठा निर्णय घेतलेला आणि माझं खूप मोठं नुकसान झालं होतं, जे कमवायला मला दोन ते अडीच वर्ष गेले होते. पण, त्यातून मला मोठा अनुभव मिळाला. विवेकला तो पूर्णपणे व्यवसायाकडे का वळला याबद्दल विचारल्यानंतर तो म्हणाला, "मी खूप निराश झालो होतो, कारण मला आयुष्यात खूप काही करायचं होतं. पण, नेहमी खाली खेचलं जायचं. जेव्हा मी दोन पावले पुढे जायचा प्रयत्न केला, तेव्हा मला चार पावलं मागे खेचलं जात होतं. माझ्याकडे दोन पर्याय होते.

## विवेकचा बिझनेस मंत्र

गुंतवणूक करण्याबद्दल विवेक म्हणाला, "मी वन नाइट स्टँडमध्ये विश्वास ठेवत नाही, तर माझा लग्नावर विश्वास आहे. मला श्रीमंत व्हायचं आहे, फक्त पैसा नाही कमवायचाय. जर रिअल इस्टेटबाबत बोलायचं झालं, तर मी थेट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या जमिनीबद्दल शिकलो. त्यांच्या घरी बसून जमिनीचा नीट अभ्यास केला आणि त्यांच्या मूलभूत गोष्टी समजून घेतल्या; त्यामुळे मला असं स्थान मिळालं, जिथे मी हळूहळू पण नक्की यशस्वी होऊ शकलो.

# अख्तर यांनी तालिबानी नेत्याच्या आदरातिथ्यावर व्यक्त केली नाराजी




**मुंबई :** तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी नुकतेच भारत दौऱ्यावर येऊन गेले. भारतात तालिबानच्या या प्रतिनिधींचं झालेलं स्वागत अनेकांच्या भुवया उंचावणारं ठरलं. भारताच्या भूमिवरून त्यांनी पाकिस्तानला इशारा दिला. तसेच शुक्रवारी (१० ऑक्टोबर) त्यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत महिला पत्रकारांना सहभागी होण्यास मनाई करण्यात होती. त्यावरून मोठा वाद झाला होता. दरम्यान, मुत्ताकी यांचं भारत सरकारने केलेलं आदरातिथ्य पाहून प्रसिद्ध गीतकार व लेखक जावेद अख्तर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी नुकतेच भारत दौऱ्यावर येऊन गेले. भारतात तालिबानच्या या प्रतिनिधींचं झालेलं स्वागत अनेकांच्या भुवया उंचावणारं ठरलं. भारताच्या भूमीवरून त्यांनी पाकिस्तानला इशारा दिला. तसेच शुक्रवारी (१० ऑक्टोबर) त्यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत महिला पत्रकारांना सहभागी होण्यास मनाई करण्यात होती. त्यावरून मोठा वाद झाला होता. दरम्यान, मुत्ताकी यांचं भारत सरकारने केलेलं आदरातिथ्य पाहून प्रसिद्ध गीतकार व लेखक जावेद अख्तर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. जावेद अख्तर म्हणाले, "जगातील सर्वात क्रूर दहशतवादी संघटना असलेल्या तालिबानच्या प्रतिनिधीला भारतात दिलेला सन्मान पाहून मला लाज वाटतेय. अख्तर यांनी केवळ तालिबनाविरोधात संताप व्यक्त केला नाही. तर, त्यांनी भारत सरकार व स्वत:ला दहशतवादविरोधी म्हणवून घेणाऱ्या संस्थांवरही तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. अख्तर म्हणाले, "देवबंदलाही लाज वाटली पाहिजे, कारण त्यांनी अशा कथित 'इस्लामिक हिरो'चं आदरपूर्वक स्वागत केलं आहे, जो त्या लोकांपैकी एक आहे ज्यांनी अफगाणिस्तानमध्ये मुलींचं शिक्षण पूर्णपणे बंद केलं आहे. माझ्या भारतीय बांधवांनो आणि भगिनींनो, आपल्याला काय झालंय? आपल्या देशात हे काय चाललंय?

## जावेद अख्तर यांचा देवबंद संस्थेवर संताप

अख्तर यांनी देवबंद संस्थेवर (दारुल उलूम देवबंद ही एक इस्लामी संस्था आहे जीला तालिबानच्या प्रतिनिधींनी भेट दिली होती) टीका केली आहे. कारण या संस्थेने तालिबानच्या प्रतिनिधीला 'इस्लामिक हिरो' म्हणत त्यांचं स्वागत केलं होतं. जावेद अख्तर यांच्या मते अशा व्यक्तीचा सत्कार करणं म्हणजे महिलांच्या शिक्षणाला विरोध करणाऱ्यांना मान्यता देण्यासारखं आहे.

# बॉक्स ऑफिसवर 'कांतारा'चा बोलबाला, तब्बल ६०० कोटी पार!



**मुंबई :** ऋषभ शेट्टी रुक्मिणी वसंत स्टारर चित्रपट कांतारा: चॅप्टर १ ने ६०० कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री केलीय. बॉक्स ऑफिसवर कांतारा हिट ठरला असून दुसऱ्या वीकेंडमध्ये भरपूर फायदा चित्रपटाला मिळाला. कांतारा चॅप्टर १ ने शनिवार -रविवारी एकूण ७९ कोटींचे कलेक्शन केलं आहे. सोबतच कांतारा चॅप्टर १ ने अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहे.

चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुसऱ्या आठवड्यात शुक्रवारी ७.१० कोटी, शनिवारी १४.३७ कोटी, रविवारी १४.६५ कोटी कमावले आहेत. एकूण १४६.२२ भारतीय बॉक्स ऑफिसवर हिंदी पट्ट्यातील हे कलेक्शन आहे.

होमेब्ले फिल्म्सने इन्स्टाग्रामवर पोस्टक करून माहिती दिली होती की, कांतारा चॅप्टर १ ने ५०० कोटी पार केले आहेत. जगभरात त्याची कमाई पहिल्या आठवड्यात ५०९.२५ कोटी झालीय. रिपोर्टनुसार, कांतारा चॅप्टर १ ने भारतात ११ दिवसात ४७८.६५ कोटींचे कलेक्शन केलं. आता वर्ल्डवाईड पाहता दुसऱ्या आठवड्यात ६०० कोटींहून अधिक कमाई केली आहे.

# माझ्यावर वशीकरण केले..



**मुंबई :** अभिनेत्री अमृता राव ही सध्या सिनेसृष्टीपासून दूर असली तरी नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये तिने केलेला काळ्या जादूचा धक्कादायक खुलासा चर्चेचा विषय ठरत आहे. बीयर बाईसेप्स फेम रणवीर इलाहाबादियाच्या पॉडकास्टमध्ये अमृताने सांगितले की, 'मी एका गुरुजींना भेटायला गेले होते. त्यांनी मला आशीर्वाद दिला. दोन दिवसांनी त्यांनी माझ्या आईशी बोलून सांगितलं की तुझ्या मुलीवर वशीकरण करण्यात आलं आहे. ही गोष्ट ऐकून मी सुन्न झाले.

अन्य कोणी असतं तर कदाचित मी विश्वास ठेवला नसता, पण हे गुरू फारच पारदर्शक आणि स्वार्थशून्य आहेत. त्यामुळे त्यांच्या बोलण्याला महत्त्व दिलं. एक काळ असा होता की मी ३ मोठ्या बॅनरच्या फिल्म्स साईन केल्या होत्या. त्या सर्व फिल्म्स त्या वर्षी निघणार होत्या. मी साइनिंग अमाऊंटही घेतला होता, पण त्या तिन्ही फिल्म्स बंद पडल्या. एकाही फिल्मचं शूटिंग पुढेच गेलं नाही. ते खूप अजीब होतं. आजही आठवलं तरी कळत नाही काय झालं होतं. तिने हे देखील मान्य केलं की, बॉलीवूडमध्ये काळा जादू किंवा वशीकरणासारख्या गोष्टी खऱ्या असू शकतात आणि पूर्वी फक्त इतर अभिनेत्रींकडून अशा अफवा ऐकल्या होत्या. सध्या अमृता राव आणि तिचा पती आर. जे. अनमोल हे दोघं मिळून यूट्यूबवर एक पॉडकास्ट शो चालवतात. त्या शोमध्ये ते सेलिब्रिटी कपल्सचे मुलाखती घेतात.

# स्व. यश मालवारच्या स्मृती प्रित्यर्थ वृद्धाश्रमात टिन शेड चे साहित्य भेट

**जनसंचलन/ चिखली**

मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, भोकर ता चिखली येथील निराधार बेघर वृद्धाच्या निवास बांधकाम साठी स्व.यश शंकरराव मलवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ मलवार परिवाराच्या वतीने टिन १० टिन भेट दिले. मानवसेवा प्रकल्प अंतर्गत कायम विनाअनुदानित तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथे वयोवृध्द आणि डिपेन्डंट व्यक्तींसाठी सर्व सोईसुविधा सह निवासी आश्रम गेल्या चार वर्षांपासून सुरु आहे. येथे गरजवंत निराधार आहेत अशा वयोवृध्द व चालते फिरते भिक्षा मागणारे आजोबा-आजी, डिपेन्डंट व्यक्ती इत्यादींसाठी सर्व प्रकरची निःस्वार्थ मोफत सेवा देणे सुरु आहे. याची दखल मलवार परिवाराने घेत स्व.यश शंकरराव मलवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ १० टिन भेट देऊन समाजात एक आदर्श निर्माण केला आहे.




तुकाराम आश्रय वृद्धाश्रमातील निराधार बेघर वृद्धांच्या सेवे करीता किणतेही शासकीय मदत मिळत नाही. परंतु समाजातील दानी व्यक्तींनी दिलेल्या मदतीवर निरंतर निःस्वार्थ सेवा देणे सुरु आहे. याची दाखल घेत शंकर राव मलवार यांनी सह परिवार येऊन स्व यश यांचा स्मृती प्रित्यर्थ वृद्धाश्रमाला साहित्य स्वरूपात मदत केली. यावेळी मलवार परिवाराचे शंकर राव मलवार, ग्रामपंचायत भोकर चे सरपंच गजानन फोलाने, सामाजिक कार्यकर्ते मनोहर डोंगरदिवे, उपसरपंच अनंता डोंगरदिवे, सदस्य, संदीप डोंगरदिवे, गणेश डोंगरदिवे, सुनील साळवे संघर्ष, केपी साळवे,अनिल साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कुठेही निराधार बेघर मुलं मुली व इतर नातेवाईक असून सुद्धा त्यांचा सांभाळत नसतील अश्या वृद्धानी ८८५५८५०३७८ या नंबर ला संपर्क करावा असे आवाहन मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांनी केले आहे.

# केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनीअतिसार ग्रस्त पिंप्री माळेगाव गावाला दिली भेट .

## ग्रामस्थांशी साधला संवाद .. ग्रामस्थाना शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे संबंधीत यंत्रनेला दिले निर्देश ...



**जनसंचलन/बुलढाणा**

अतिसाराची लागण झालेल्या बुलडणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पिप्री माळेगांव गावाला काल २५ ऑक्टोंबर रोजी केंद्रीय आयुष्य आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट दिली . गावकऱ्यांची संवाद साधला .. दूषित पाण्यामुळे गावातील नागरिकांना अतिसार ची लागण झाल्याचे लक्षात येतात गावाला शुद्ध पाणी पुरवठा करण्यासंदर्भात तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिलेत बुलढाणा जिल्ह्याचे शेवटचं टोक असलेल्या संग्रामपूर तालुक्यातील पिप्री माळेंगाव ( अडगांव ) येथे दुषित पाण्याचा पुरवठा झाल्यामुळे गावातील नागरिकांना पोटदुखी आणि अतिसारामुळे गावकरी त्रस्त झाला होता . सुमारे दोन हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला वाण धरणातून १४० गाव पाणीपुरवठा योजनेतून पाणी पुरवठा होत आहे. १४० गाव योजनेतून गावातील सार्वजनिक विहिरीत येणाऱ्या पाण्याची पाईपलाईन लिकेज झाल्यामुळे घाण पाणी त्यात मिसळत आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रत्यक्ष गावात जावून गावकर्यासोबत संवाद साधला अधिकाऱ्या सोबत आढावा घेतला व गावाला तात्काळ स्वच्छ पाण्याच्या पुरवठा व्हावा यासंदर्भात सूचना दिल्या आहेत. १४० गाव योजनेतील पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचे लिकेज व इतर दुरुस्तीचे काम त्वरित करून पाणी हे टाकी सोडून ते ग्रामस्थांना नळाद्वारे पाणी देण्याच्या दृष्टिकोनातून तात्काळ काम करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले . गावातील नागरिकांना तात्पुरत्या स्वरूपात शुद्ध पाणी देण्यासाठी दोन सिंटेक्सच्या टाक्या बसून पाणी देण्याचे निर्देश संग्रामपूरच्या गट विकास अधिकारी यांना दिलेत गावच्या हनुमान मंदिरामध्ये ग्रामस्थांशी संवाद साधला त्यानंतर गावाला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या विहिरीवर जाऊन तिची पाहणी केली ..यावेळी शिवसेना सहसंपर्क प्रमुख श्री.शांताराम दाणे, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.संतोषराव डिवरे,उपविभागीय अधिकारी श्री.काळे साहेब,तहसीलदार श्री.प्रंशात पाटील, आरोग्य अधिकारी श्री.मारोडे साहेब,माजी जिल्हा परिषद सदस्य श्री.राजु पाटील ठाकरे,युवासेना लोकसभा अध्यक्ष श्री.चेतन पाटील तालुका प्रमुख श्री.केशव ढोकणे,शहरप्रमुख श्री.संतोष लिप्ते शिवसेना,युवासेना,महिला आघाडी व महायुतीचे आजी-माजी प्रमुख पदाधिकारी तथा आरोग्य विभाग व महसूल,ग्रामविकास विभागाचे अधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डोंगर खंडाळ्याची मान लोणावळ्यात: ग्राम विकासाचे शिल्पकार श्याम सावळे (पाटील) सन्मानित !

## विकासाची दखल घेत महाराष्ट्र ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने झाला गौरव: ग्रामस्थांकडून जल्लोष

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यातील कार्यक्षम व प्रतिभावंत सरपंच म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगर खंडाळा ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच श्याम बळीराम सावळे यांना नुकताच लोणावळा येथे पंचायत राज विकास मंच संचलित अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने ङ्गग्रामरत्नफ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गावात राबवलेल्या विकासकामांची दखल घेऊन पंचायत राज विकास मंचाच्यावतीने बुलढाणा तालुक्यातील डोंगर खंडाळा येथील प्रभारी सरपंच श्याम सावळे यांना महाराष्ट्र ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लोणावळा येथे २६ ऑक्टोबर रोजी हा गौरव सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. या पुरस्काराने डोंगर खंडाळा गावाची मान उंचावली असून ग्रामस्थांनी जल्लोष करीत आनंद व्यक्त केला आहे.




**ग्रामस्थांना पुरस्कार समर्पित :**
हा पुरस्कार डोंगर खंडाळा ग्रामपंचायतीतील प्रत्येक ग्रामस्थांला समर्पित असून डोंगर खंडाळा ग्रामस्थांचे प्रेम, पांठिबा, आशिर्वाद हेच या यशाचे बळ आहे, तसेच नेहमीच पांठिबा देत असलेले सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारीवर्ग यांचे मिळत असलेले सहकार्य यांनी दिलेला आधार व पाठबळ याबद्दल आभारी आहे.
प्रभारी सरपंच श्याम सावळे ग्रामपंचायतडोंगरखंडाळा

अखिल भारतीय सरपंच परिषद संलग्रित पंचायत राज विकास मंचचा रविवारी २६ ऑक्टोबर रोजी लोणावळा येथे ग्रामरत्न सरपंच पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे स्वीय सहायक मंगेश चिवटे, यशदाचे संचालक मल्लिनाथ कलशेट्टी () यांची प्रमुख उपस्थिती होती. विकासकामांच्या माध्यमातून गावचा चेहरामोहरा बदलणाऱ्या कल्पक सरपंच नेतृत्वाचा सन्मान करण्यात आला. डोंगर खंडाळा येथील प्रभारी सरपंच श्याम सावळे यांनी अल्पावधीत गावात अनेक विकासकामे मार्गी लावली. त्यांनी केलेल्या कामाची पावती ग्रामरत्न सरपंच पुरस्काराच्यारुपाने मिळाल्याच्या भावना सर्वच स्तरातून व्यक्त होत आहेत.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक जनसंचलन निडर निर्भीड
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# खामगावात शिंदेसेनेची आढावा बैठक उत्साहात

जनसंचलन/ खामगाव

शहरातील तुळजाई हॉटेल येथे खामगाव नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिंदेसेनेची आढावा बैठक शनिवारी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडली. या बैठकीत शहरातील शिंदेसेनेचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान पक्ष संघटनात्मक घडामोडी, आगामी निवडणूक तयारी, तसेच प्रचार नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. केंद्रीय मंत्री जाधव यांनी संबोधित करताना सांगितले की, आगामी नगर परिषद निवडणुकीत शिवसेनेचा भगवा पुन्हा एकदा नगर परिषद भवनावर फडकवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कामाला लागावे, तसेच इच्छुक उमेदवारांना आपल्या कार्याचा सविस्तर अहवाल सादर करून अर्ज सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांनी केले. बैठकीस प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हाप्रमुख संतोष डिवरे पाटील, जिल्हा सहसंपर्कप्रमुख शांताराम दाणे, तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत खामगाव शहरातील शिंदेसेनेच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. शहर समन्वयक म्हणून डॉ. अभिजीत महानकर, तर शहर संघटक म्हणून उमेश (तब्बू) तायडे व आदर्श आनंदे यांची नियुक्ती करण्यात आली

# भीमगर्जना कार्यालय उद्घाटन प्रसंगी, भाई अशांत वानखेडे यांची साखरतुला



जनसंचलन/मलकापूर

ज्येष्ठ सामाजिक नेते भाई अशांत वानखेडे यांच्या वाढदिवसा निमित्त व भीमगर्जना मुख्य कार्यालयाचे उद्घाटनाच्या औचित्य साधून भाई अशांत वानखेडे यांची साखर तुला करण्यात आली. मलकापूर येथील स्टेशन रोडवरील भीमगर्जनाचे नव्याने सुरू झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन भाई अशांत वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले असून याच वेळी त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त साखर तुला करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलाने करण्यात आली भीमगर्जना चे नव्याने सुरू झालेले कार्यालयाचे फीत कापून भाई अशांत वानखेडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्य अतिथी म्हणून भाई अशांत वानखेडे अध्यक्ष समतेचे निळे वादळ, धनश्रीताई काटीकर पाटील हिंदी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र अध्यक्ष, प्रा प्रकाश थाटे राष्ट्रीय अध्यक्ष लाईव्ह, अशोक सुरडकर महाराष्ट्र प्रमुख भीमगर्जना, अजय टप विदर्भ संघटक हिंदी मराठी पत्रकार संघ, दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजयजी डागा , श्रीकृष्ण तायडे जिल्हाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, सतीश दांडगे विदर्भ सचिव हिंदी मराठी पत्रकार संघ, सुधाकर तायडे तालुका अध्यक्ष, रवी वाकोडे, बळीराम बावस्कार, नथुजि हिवराळे, शेख निसार , मयूर लड्डा, अनिल गोटी, आत्माराम मोरे, प्रा. विजय तायडे, रवी बाभुळकर, मुन्ना रायपुर, दिलीप इंगळे , ऋषिकेश तेजेकर , मंगेश मेढे, रवी दाभाडकर हे उपस्थित होते

# ब्राह्मण समाज दिवाळी स्नेह मिलन तथा विप्र फाउंडेशन मलकापूर कार्यकारणी शपथविधी कार्यक्रम संपन्न

जनसंचलन/मलकापूर

आपल्या संस्कृतीचे जतन दिवाळी पर्व निमित्त समाज बंधू-भगिनी एकत्रित यावे एकमेकांच्या भेटी,शुभेच्छा,परिचय या उद्देशाने प्रति वर्ष विप्र चॅरिटेबल ट्रस्ट मलकापूर द्वारे दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम आयोजन केल्या जाते या वर्षी मलकापूर येथील सुमतीनाथ भवन येथे दीपावली स्नेह- मिलन तथा ब्राह्मण समाज तथा हिंदू धर्म संस्कृती हित जोपासणारे संघटन उन्नत समाज समर्थ राष्ट्र या ब्रीद मंत्र वर कार्य करणारे संघटन मलकापूर कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात प्रमुख विशेष अतिथि दामोदरजी पांडे, विप्रो फाउंडेशन राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य खामगांव,शैलेशजी शर्मा विप्र फाउंडेशन जिल्हा अध्यक्ष बुलढाणा, राजेशजी राजोरे जिल्हा मार्गदर्शक, सुरेशकुमार शर्मा जिल्हा मार्गदर्शक , मोहन शर्मा राजस्थानी विप्र समाज चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष द्वारा भारत माता, भगवान परशुराम, गौतम ऋषी प्रतिमा पूजन, दीप प्रज्वल करून झाली, सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता राजेश राजोरे यांनी उपस्थित समाज बांधवांना उन्नत समाज संपन्न राष्ट्र या विषयावर संबोधित केले , शैलेश शर्मा यांनी विप्र फाउंडेशन कार्य या विषयावर प्रबोधन केले कार्यक्रम चे सूत्रसंचालन विशालज दवे , प्रास्ताविक परिचय अजय शर्मा ,आभार प्रदर्शन जिल्हा मार्गदर्शक सुरेश शर्मा यांनी केले उपरांत विप्र फाउंडेशन मलकापूर अध्यक्ष पदी मनीष पंडित , राधेश्यामजी शर्मा उपाध्यक्ष ,दामोदर शर्मा उपाध्यक्ष, राजेंद्रजी ओझा उपाध्यक्ष, विशाल दवे सचिव ,सुयोग शर्मा सहसचिव, हेमंत शर्मा कोषाध्यक्ष, परमानंद व्यास , सहकोशाध्यक्ष ,अशोक व्यास संघटक मंत्री ,राजेंद्र पांडे संघटन मंत्री, राधेश्याम चौबे स्वास्थ मंत्री ,सुरज प्रसाद शुक्ला शिक्षा मंत्री, महेश इंदोरिया क्रीडा सांस्कृतिक मंत्री, चेतन शर्मा क्रीडा सांस्कृतिक सहमंत्री, सागर शर्मा सूचना आणि प्रसार मंत्री , राजेश शर्मा सदस्य ,दिनेश जोशी सदस्य , तर मार्गदर्शक म्हणून कमलकिशोर शर्मा ,मदन तिवारी ,रामचंद्र टीकनायक, मोहन शर्मा यांच्या घोषणा करण्यात आल्या तर युवा प्रकोष्ठ अध्यक्ष रवी शर्मा,योगेश शर्मा उपाध्यक्ष, ,गिरीश शर्मा क्रीडामंत्री ,नैतिक शुक्ला क्रीडा सहमंत्री ,कमल शर्मा स्वास्थ्यमंत्री, अजय शर्मा स्वास्थ सहमंत्री, अभिषेक शर्मा विधी संपर्क मंत्री, धीरज थानवी विदेश मंत्री, यांच्या उपस्थितीत सामजिक कार्य आणि दायित्व निर्वाहन शपथ विधी घेतली


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**

| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४